# बालनाट्यलेखन स्वरूप आणि विकास

**डॉ. देशमुख रमेश तुकोजीराव**
मराठी विभाग प्रमुख,
सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र ही नाटथलेखनाची व सादरी करणाची भूमी आहे. सर्व भारतीय क्षेत्रीय भाषांच्या तुलनेत मराठी भाषेतील नाट्यलेखन हे गौरवास्पद आहे. विष्णूदास भावे यांच्यापासून सुरू झालेली ही नाटयपरंपरा आजतागायत जोमात सुरू आहे. मराठी परांमपरिक रंगभूमीची वाटचाल ही इ.स 1843 पासूनच सुरू झाली आहे. या परांमपरिक नाट्यलेखानाच्या दालनात व साहित्य क्षेत्रात बालसाहित्यानेही आपला साहित्य लेखनातील संसार थाटला आहे. बालसाहित्यच्या निर्मितीला सुरूवात मुद्रणपूर्वकालापासून झालेली आहे. पण बालनाटकांच्या निर्मितीला खऱ्या अर्थाने जी सुरूवात झालेली दिसते ती एकोनिसाव्या शतकापासून असे असले तरी आज या 'बालनाट्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. बालनाटकांच्या लेखनात झपाट्याने दिवसेंदिवस वाढ होत आहे. मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरातून बालनाटकांचे प्रयोग सुरू झाले आहेत. येथूनच बालरंगभूमीने आपल्या पाया रचला आहे. यामध्ये झपाट्याने गुणात्मक, संख्यात्मक व प्रयोगशील अशी सादरी करण्याच्या स्वरूपाने देखील बालनाटकात वाढ झाली आहे.

## 1. बालनाट्यभूमी निर्मितीची सुरूवात:

बालवाङ्मयाच्या निर्मितीला सुरूवात मुद्रण पूर्वकालापासून झाली आहे. सौ. मालतीबाई बेडेकर 'बालवाङ्मयाची रूपरेखा' ह्या पुस्तकात म्हणतात. मुद्रणपूर्वकालातही स्त्रीजीवनांकडून अलिखित बालगाणी अंगाई गीते झोपळ्यवरील गाणी रचली गेली? बालनाट्यलेखनास खऱ्या सुरूवात 1828 मध्ये झाली. बालमित्र मध्ये 'स. के. छत्रे' मुलांसाठी लिहिलेले संवाद प्रथम वाचावयास मिळतात. एखादा विषय छोट्या मुलांना सोपा करून सांगण्यासाठी एखादा विषय संवादातून मांडावा असा विचार पुढे येवू लागला बालनाट्य लेखनाला संवादाच्या रूपानेच खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.

जशी इतर लेखाना ललित वाङ्मयाची गरज आहे तशी लहान मुलानाही गरज आहे. त्यांना छान छान कथा ऐकायला वाचायला आवडतात अशा छंदातूनच त्यांना छोट्या छोट्या भूमिका करून बघायलाही आवडतात. नाटकातील पात्र स्वतः करण्यात जसा आनंद वाटतो तसाच नाटक पहाण्यातही त्यांना आनंद वाटतो. बालनाटकात व्यक्तिचित्रणाला, मनोविश्लेषणाला फारसे स्थान नसते. मुलांच्या जीवनानुभवांचा अवाका तोकडा असतो त्यातील नाट्य घटना तेवढ्या टिपल्या जातात. बालनाट्याला समजतील कथानक, संवाद लागत असतात बालनाटकातील संहिता व अंक लहान लहान असतात. एकेका अंकात अनेक पात्रे, अनेक प्रसंग अनेक भावनाचा अविष्कार होत

असतो, त्यामुळे अनेक घटना प्रसंगातून अनेक व्यक्तींच्या दर्शनातून नाट्यातील एकता साधली जाते. ही एकताच बालनाट्य विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाची असते. राम गणेश गडक-यांनी 'सकाळचा अभ्यास व दोन चुटके' ही प्रहसने इ.स. 1900 च्या सुमारास लिहून आधुनिक बालरंगभूमीचा पाया घातला सकाळचा अभ्यास' या प्रहसनातून विद्यार्थ्यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांच्या स्वभावाचे दर्शन घडविले. त्या काळात या नाटकाचे भरपूर प्रयोग झाले. हे नाटक त्या काळात खूप गाजले म्हणूनच मराठीतले पहिले बाल नाटक म्हणून 'सकाळचा अभ्यास' हे नाटक ओळखले जाते; तर आधुनिक मराठी बालरंगभूमीचे जनक लेखक दिग्दर्शक म्हणून रत्नाकर मतकरी ओळखले जातात. या काळात बऱ्याच बालनाट्य लेखांनी प्रयत्न केलेले दिसतात. त्यात वंदना विटणकर, शिशुरंजन जागर या संस्थांनी बालरंगभूमी एक चळवळ मानून बालरंगभूमीचा प्रवास सुकर केला. मुंबईला सुलभा देशपांडे यांनी अविष्कार तर्फे ‘दुर्गा झाली गौरी’ हे नृत्यनाट्य सादर केले. तसेच लीलाताई भगवंताचे 'पंडित पंडित तुझी अक्कल शेंडीत' या नाटकाने बालरंगभूमीला नवचैतन्य निर्माण करण्याचे काम केले. बालरंगभूमीला उज्वल भविष्याचा हिरवा शालू दाखवला; तर सुधा करमरकर यांनी ‘मधुमंजिरी’ हे नाटक सादर करून नवीन बालरंगभूमीच्या तंत्राचा झेंडा फडकवला तसेच सई परांजपे यांनी बरीच बालनाटके लिहून बालनाट्य वाङ्मयात मोलाची भर घातली. आतापर्यंत बऱ्याच नाटककारांनी बालनाटके लिहिली. प्रयत्नपूर्वक बालकांसाठी नाटके लिहिली, नाटकांची निवड भाषेची निवड कलाकारांचे स्वभावचित्रण, बालप्रेक्षकांची अभिरूची, एका ठिकाणी बसण्याची क्षमता या सर्व गोष्टींचा विचार करून नाटककारांनी बालनाटके लिहिलेली आहेत. त्यामुळे मुलांना ती नाटके पहायला, वाचायला आवडतात. म्हणूनच नाट्यलेखकांची बालनाटके रंगभूमीवर यशस्वी झाली आहेत.

बालमनाला वाऱ्यावर डोलणारी फुले ‘आवडतात’ परीच्या गोंडस रूपात ती फुले त्यांच्या कल्पना विश्वात जातात. बालमनाला मोठ्या माणसांकडून काळ्या अंधाराची भीती दाखवली जाते. म्हणून बालकांना त्या काळचा अंधाराची भीती वाटायला लागते. तो अंधार त्यांच्या कल्पनेच्या विश्वात राक्षसाचे रूप घेऊन जातो. ते बालमनच कल्पनासृष्टीचा निर्माता असते. अशा या बालमनाच्या विश्वात पातळीवर प्रतिभावान नाटककारांचे मन येते. बालकांच्या अनुभव विश्वातील नाट्य ठरते. नाटकांत अनुभव डोळ्यासमोर प्रत्यक्ष साकार होत असल्यामुळे त्यात योग्य प्रत्ययकारिता येते बालनाटकांतून मुलांच्या आवडत्या गोष्टीतील नाट्य जर साकार करून दाखवता आले; तर मुलांना गंमत वाटते व आनंद होतो.

मुलांना गोष्टीमध्येही परिकथा जास्त आवडतात. परिकथेच विश्व म्हणजे मुलांच आवडते 'कल्पना विश्व' आहे पुष्कळशा बालनाटकांत कल्पना सृष्टीची विविध रुपे दिसतात. शेपटीचा शाप, झाली काय गंमत, गाणारी मैना, ह्या बालनाटकात प्रतिभावंत मनाने निर्माण केलेली. बालकांना अकृष्ट करणरी, हीच कल्पना सृष्टी आहे. बालनाटकातील कल्पनासृष्टी म्हटली तरी तिला आधार वास्तवातील सृष्टीचाच असतो. वास्तवसृष्टीत प्रमाणे मानवांना भावना आहेत तशा भावना कल्पनासष्टीतल्या राजाराण्यांनाही असतात. त्यांना राग, लोभ, क्रोध सारे काही असते, पत्तेनगरीतील गुलाम राजाविरुद्ध बंड करतो. गुलाम त्यांच्या हाताखालच्या दुळ्यातिळ्यांना चव्याछक्यांना फार

त्रास देत असतो म्हणून दुळ्या हेरगिरी करून त्याचा कट उघडकीस आणतो. ही कल्पनासृष्टी वास्तवावर आधारलेली आहे. म्हणूनच तिच्याशी आपणास ऐकरूप होता येत. तिच्यातील सौंदर्य न्हाळता येतं, बालनाटकांच्या कल्पनासृष्टीत मुलांना आवडणाऱ्या गोष्टींचाच भरणा जास्त आसतो. तेथे खाऊची बाग असते, खेळण्याची दुनिया असते, छोट्याशा पऱ्या असतात, रंगीबेरंगी कपडे घातलेले जोकर असतात. प्रत्येक ललित कृती ही नाट्य लेखकांच्या कल्पना विश्वातून साकार होते. म्हणजेच ललितकृतीत निर्माण होणारे विश्व हे एका अर्थाने काल्पनिकच असते, 'पण लक्षात कोण घेतो या बालनाटकात आपल्याला वास्तवाचे दर्शन होते. बाल वयात काही काळ मुले काल्पनिक विश्वात जगत असतात. म्हणून खाऊची बाग, खेळण्याची दुनिया ह्यांची कल्पनाचित्रे ही त्यांच्या विश्वासी सुसंगतच असतात. त्यांच्या बालसृष्टीतील ती वास्तव चित्रे असतात. बालनाटकांचे शेवट है गोडच आहेत.

'झाली काय गंमत' या नाटकांमध्ये शेवटी निरूपमचा पाय बरा होतो, 'जादूचा वेल' मध्ये सर्व आपत्तीतून गोपू सोन्याची अंडी देणारी कोंबडी आईला आणून देतो व दोघे श्रीमंत होतात. बालमने आपल्या कल्पना विश्वात आपल्याला हवे ते घडवू शकतात व आनंद उपभोगतात. बालसद्दशमनाच्या अशा अनुभव विश्वातून ही नाट्यकृती जन्मास येत असते आणि म्हणून बालनाटकांच्या शेवटातील योगायोग बालमनाला खटकत नाहीत. बालनाटकाधी भाषा साधी, सरळ व सोपी पण अचूक अशा शब्दांनी भरलेली आहे.

अद्भूत परिकथांचा आवलंब करून काही नाटके लिहिली गेली परिकथांचे विश्व हे बालकांचे आवडते विश्व आहे ही स्वप्नील दुनिया रंगभूमीवर दाखवली तर मुलांना खूप आनंद होईल आतापर्यंत चालु असलेल्या प्रवासाला एक प्रकारची गती मिळेल या उद्देशाने इंग्रजीत गाजलेल्या लोककथाकडे बालसाहित्यिक आकर्षिले गेले अद्भूत समस्येचा वेगळा एक नवीन प्रवाह जोमाने वाहू लागला. लोककथा अद्भुत रम्य वातावरणात रमणारी, बालमनाला आकर्षुन घेणारी नायक-नायिका मुलांच्या वयाची असल्याचे हे ओळखून सौ.सुधा करमरकर यांनी सर्वप्रथम 'जादूचा वेल' हे इंग्रजी लोककथेवर आधारित बालनाटक लिहून नव्या वळणाचा एक पायंडाच मांडला हे नाटक आधुनिक तंत्राचा वापर करून लिहिलेलं आहे. तसेच कुमुदिनी रांगणेकरांनी 'इच्छानगरी' सई परांजपे यांनी 'पत्तेनगरीत शेपटीचा शाप', 'झाली काय गंमत' नालतीबाई दांडेकर यांनी 'पऱ्याची राणी', 'संगीत चंद्राचे वरदान', सुंदर देश', 'सोनेरी नदीचा राजा' अशी नाटके लिहून ती प्रयोग रूपाने बालरंगमंचावर सादरही केली. त्यांनी या नाटकातून विनोदाबरोबरच अद्भुतरम्यतेलाही प्राधान्य दिलेलं आहे.

**समारोप:**

बालनाट्य रंगभूमीची सुरूवात गडकरी यांच्या 'सकाळच्या अभ्यासाने झाली. मराठी बालनाट्य रंगभूमीची आधुनिक तंत्रामध्ये बसणारी संहिता लिहून खऱ्या अर्थाने बाल नाटकांची सुरूवात झालेली दिसते. आचार्य अत्र्यांनी 'गुरूदक्षिणा' या सारखी नाटके लिहून आणखी महत्त्वाची भर घातली, पुढे स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र बालरंगभूचीचा प्रवास जलद गतीने सुरू झाला येथून पुढे अनेक लेखकांनी बालनाटके लिहिली, म्हणूनच स्वातंत्र्योत्तर कालखंडात बालरंगभूमीला बहर आला. नाटकांची निवड, भाषेचा पोत, कलाकारांचे स्वभावचित्रण, बालप्रेक्षकांची

अभिरूची, त्यांना आपलेसे वाटनारे कथानक त्यांची एका ठिकाणी बसण्याची क्षमता यांचा विचार करून नाटककारांनी लिहिलेली नाटके फारच कमी आहेत. असे असले तरी संवाद, वातावरणनिर्मिती, व्यक्तीरेखांची स्वभाविकता, बालनाटकातील विनोद, लयबधता, पात्रे, भाषा, अंक व प्रवेश इ. प्रसंग उत्तम तन्हेने एकत्र गुंफल्यामुळे बालनाटके परिणामकारक व यशस्वी झालेली दिसतात. तसेच बालनाटके रचना बंध व प्रयोगाच्या दुष्टीने सुध्दा यशस्वी झालेली आहे. म्हणूनच दिवसेंदिव बालनाटके लेखक व बालटनाटके यांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. सौ. मालतीबाई बेडेकर, बालवाङ्मयाची रूपरेखा.

2. ले.व.शा. देसाई-नट, नाटक व नाटककार. (1956)

3. प्रा.डॉ. रमेश देशमुख - मराठी प्रयोगिक रंगभूमी : स्वरूप आणि विमर्श

4. प्रदक्षना खंड 1 व 2.